महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण-२०२३
----शुध्दीपत्रक.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांकः हहाधो-२०२३/प्र.क्र.२५५/ऊर्जा-७.**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ३० सप्टेंबर, २०२४.

**वाचा :-**

शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग क्र.हहाधो-२०२३/प्र.क्र.२५५/ऊर्जा-७, दिनांक १७.१०.२०२३.

**शासन शुध्दीपत्रक:**

महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण-२०२३, संदर्भाधिन शासन निर्णय दिनांक १७.१०.२०२३ मधील तरतूद क्र.१ (१.२) व १२ (१) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा व तरतूद क्र.१२ (२) मध्ये खालीलप्रमाणे मजकूर प्रविष्ट करण्यात येत आहे:-

| शासन निर्णयातील तरतुद क्र. | शासन निर्णयातील मूळ तरतुद | प्रविष्ट सुधारित मजकूर/नवीन मजकूर |
|---|---|---|
| १ (१.२) व्याख्या | **अँकर युनिट** :- अँकर युनिट म्हणजे महाराष्ट्र राज्यात किमान ५० kTPA क्षमतेचे प्रथम कार्यान्वित होणारे ३ हरित हायड्रोजन व तत्सम उत्पादन प्रकल्प. | **अँकर युनिट :-** अँकर युनिट म्हणजे पारदर्शक प्रक्रियेद्वारे निवड केलेले महाराष्ट्र राज्यात आस्थापित होणारे किमान ५० kTPA क्षमतेचे ०३ हरित हायड्रोजन प्रकल्प किंवा तत्सम उत्पादन प्रकल्प. तथापि, देशांतर्गत बाजार विकासाच्या दृष्टीने प्रायोगिक तत्त्वावर मुंबई महानगर क्षेत्रामध्ये १० ते १५ केटीपीए क्षमतेच्या ०२ हरित हायड्रोजन व तत्सम उत्पादन प्रकल्पांची पारदर्शक प्रक्रियेद्वारे अँकर युनिट म्हणून निवड करण्यात येईल. |
| १२ (१) | **अँकर युनिट** :- अँकर युनिट म्हणजे महाराष्ट्र राज्यात किमान ५० kTPA क्षमतेचे प्रथम कार्यान्वित होणारे ३ हरित हायड्रोजन व तत्सम उत्पादन प्रकल्प. | **अँकर युनिट** :- अँकर युनिट म्हणजे पारदर्शक प्रक्रियेद्वारे निवड केलेले महाराष्ट्र राज्यात आस्थापित होणारे किमान ५० kTPA क्षमतेचे ०३ हरीत हायड्रोजन प्रकल्प किंवा तत्सम उत्पादन प्रकल्प. तथापि, देशांतर्गत बाजार विकासाच्या दृष्टीने प्रायोगिक तत्त्वावर मुंबई महानगर क्षेत्रामध्ये १० ते १५ केटीपीए क्षमतेच्या ०२ हरित हायड्रोजन व तत्सम उत्पादन प्रकल्पांची पारदर्शक प्रक्रियेद्वारे अँकर युनिट म्हणून निवड करण्यात येईल. |
| १२ (२) अँकर युनिटस् करीता लाभ व सवलती | ---- | **तरतुद क्र. १२ (२) (इ) नंतर खालील मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे:-**<br>उपरोक्त पारेषण शुल्क व व्हिलिंग चार्जेस सवलत आणि विद्युत शुल्क सूट प्रायोगिक तत्त्वावर स्थापन होणाऱ्या अँकर युनिटसला लागू राहील. मात्र, अशा प्रायोगिक प्रकल्पांना जास्तीत जास्त १५ टक्के भांडवली खर्च अनुदान अनुज्ञेय राहील. तसेच, या धोरणांतर्गत अँकर युनिट/प्रायोगिक अँकर युनिट म्हणून निवड झालेल्या प्रकल्पांस एकूण ३०० केटीपीए क्षमतेच्या मर्यादेत, सदर निवड प्रक्रियेच्या अधिन राहून या धोरणांतर्गत अनुज्ञेय सवलती / लाभ देण्यात येतील.” |

२.  सदर शासन शुध्दीपत्रक मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक २३.०९.२०२४ रोजीच्या बैठकीतील मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२४०९३०१७४३५०८२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NARAYAN SHRIKRISHNA KARAD

Digitally signed by NARAYAN SHRIKRISHNA KARAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT,
2.5.4.20=fc35aa8ffade5bb6105200693c60a32b755f7e67f72965b8dd57adaa570981f1,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=AE7FAEABAF4571C2748E4DD5FFD2CD108DE0E130859970F4D7D0EE40046B3E9E,
cn=NARAYAN SHRIKRISHNA KARAD
Date: 2024.09.30 17:45:17 +05'30'

**(नारायण कराड)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.सभापती/मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे सचिव, मुंबई,
३. मा.उप सभापती/मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे सचिव, मुंबई,
४. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.उप मुख्यमंत्री (ऊर्जा), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई,
८. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. सर्व विधानपरिषद/विधानसभा सदस्य, विधानभवन, मुंबई,
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
११. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. अपर मुख्य सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (उद्योग), उ.ऊ.का.व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (परिवहन व बंदरे), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई,
१९. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
२०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२१. सचिव, मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोग, मुंबई (पत्राने),
२२. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्या.,मुंबई,
२३. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या.,मुंबई,
२४. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या.,मुंबई,
२५. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी मर्या.,मुंबई,
२६. सर्व विभागीय आयुक्त,
२७. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पुणे,
२८. सर्व जिल्हाधिकारी,
२९. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा,
३०. सह सचिव (ऊर्जा-७), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई,
३१. ऊर्जा उप विभागातील सर्व कार्यासने,उद्योग,ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई,
३२. निवड नस्ती/ऊर्जा-७.